SAKAL

Monday, Feb 22, 2010.

# टाटा ग्रुपच्या 'टाटा क्रुसिबल कॅम्पस स्पर्धे'ला सुरुवात

नागपूर, ता. २१ : भावी पिढीला निष्णात बनविण्याच्या उद्देशाने आयोजित टाटा ग्रुपतर्फे 'टाटा क्रुसिबल कॅम्पस स्पर्धेला' शनिवारी नागपुरातून सुरुवात झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतल्या जाणाऱ्या या स्पर्धेच्या पहिल्या प्रादेशिक फेरीत स्थानिक आय. एम. टी. महाविद्यालयाच्या नेहा कटियाल आणि सौम्याजित सामंता या जोडीने सर्वाधिक अचूक उत्तरे देत राष्ट्रीय फेरीत धडक दिली.

हॉटेल प्राईडमध्ये आज दुपारी तीन वाजता ही अभिनव प्रश्नमंजूषा सुरू झाली. ज्यात तरुण-तरुणींचे विविध ठिकाणचे १३० संघ सहभागी झाले होते. त्यातील अनेक क्लिष्ट प्रश्नांना सर्वाधिक अचूक उत्तरे देत नेहा आणि सौम्याजितने आपल्या बुद्धिकौशल्याच्या बळावर प्रादेशिक फेरीत विजय संपादन केला. व्हीएनआयटीचा संघ उपविजेता ठरला. नेहा आणि सौम्याजितला ७५ हजारांचे तर उपविजेत्या संघाला ३५ हजारांचे पुरस्कार देऊन व्हीएनआयटीचे रजिस्ट्रार भास्कर गणवीर यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

स्पर्धेचे संचालन श्री. गिरी बालसुब्रम्हण्यम यांनी केले. नेहा आणि सौम्याजितची जोडी आता देशभरातील तरुणाईचे बौद्धिक आव्हान आपल्या समयसुचकतेच्या जोरावर पेलणार आहेत. भारतातील नागपूर, रांची, इंदूर, गुवाहाटी, दिल्ली, लखनऊसह वीस महानगरांत ही स्पर्धा घेतली जाणार असून, स्पर्धेचा अंतिम आंतरराष्ट्रीय सामना मुंबईत होईल.




टाटा क्रुसिबल स्पर्धेच्या प्रादेशिक फेरीत विजयी ठरलेले नेहा आणि सौम्याजित.